# * आरोग्य विभाग *

| अ. क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरवणारे अधिकारी | संपर्क कालावधी | सेवा पुरवण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाचे वरिष्ठ अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | अ) सुधारित क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम अंमलबजावणी आ.सी.टी व एस. टी. डी. क्लीनिक इ)एडस नियंत्रण कार्यक्रम ई) ए. आर. टी. सेंटर फिरता दवाखाना Training cell कर्मचारी प्रशिक्षण आयोजन उ) राष्ट्रीय कुष्ठरोग नियंत्रण कार्यक्रम राबविणे | सहाय्यक आरोग्य अधिकारी | सकाळी १०.०० ते सायं. ५.४५ | नियमित | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| अ. क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरवणारे अधिकारी | संपर्क कालावधी | सेवा पुरवण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाचे वरिष्ठ अधिकारी |
| २ | अ) पल्स पोलिओ लसीकरण मोहिम<br>आ) नियमित लसीकरण कार्यक्रम<br>इ) जननी सुरक्षा योजना<br>ई) कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया<br>उ) जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम<br>ऊ) प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान<br>ओ) AFP सर्वेक्षण/गोवर सर्वेक्षण<br>औ) प्रधानमंत्री मातृ वंदना योजना<br>शालेय आरोग्य तपासणी<br>लस व शितसाखळीविषयक व्यवस्थापन<br>नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरील ANH/LHV विषयक व्यवस्थापन | वैद्यकीय अधिकारी सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र | सकाळी ८.०० ते सायं. ४.३० | नियमित | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| ३ | नागरी आरोग्य केंद्र कार्यक्षेत्रात डास अळी, नाशक फवारणी करणे, धुरिकरण करणे व सर्वेक्षण करणे | संबंधित नागरी आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी | सकाळी ७.३० ते दुपारी ३.३० | तक्रार प्राप्त झाल्यानंतर २४ तासांत | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| ४ | अ) हिवताप उपविधीची अंमलबजावणी<br>आ) साथरोग व पाणी नमुने | वैद्यकीय अधिकारी | सकाळी १०.०० ते सायं ५.४५ | आवश्यक कागदपत्रे व त्रुटींची पूर्तता केल्यानंतर ७ दिवसांत | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| ५ | बनावट वैद्यकीय व्यावसायिक पर्यवेक्षण नियंत्रण | अपघात वैद्यकीय अधिकारी | सकाळी १०.०० ते सायं ५.४५ | नियमित | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | मटण विक्रेते यांना व्यवसाय प्रशिक्षण/पर्यवेक्षण/नियंत्रण करणे आ) श्वान नियंत्रण/मूषक नियंत्रण/ वराह नियंत्रण कार्यक्रम-पर्यवेक्षण/ कोंडवाडा व्यवस्थापन | पशुवैद्यकीय अधिकारी | सकाळी १०.०० ते सायं ५.४५ | नियमित | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |

**रुग्णालयीन आरोग्य सेवा**

| अ. क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरवणारे अधिकारी | संपर्क कालावधी | सेवा पुरवण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाचे वरिष्ठ अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| ७ | रुग्णालयीन सेवा सुविधा | वैद्यकीय अधिक्षक सार्वजनिक रुग्णालय, (वाशी नेरुळ, ऐरोली) | सकाळी १०.०० ते सायं ५.४५ | नियमित | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| | | वैद्यकीय अधिकारी, माता बाल रुग्णालये, (बेलापूर, तुर्भे, कोपरखैरणे) | सकाळी ८.०० ते ते सायं ४.०० | नियमित | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| ८ | अ) पल्स पोलिओ लसीकरण मोहिम आ) AFP सर्वेक्षण इ) नियमित लसीकरण ई) जननी सुरक्षा योजना उ) कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया ऊ) मातृत्व अनुदान योजना ए) ना. आ. केंद्र स्तरावरील ANH/LHV विषयक व्यवस्थापन ए) लस व शितसाखळीविषयक व्यवस्थापन | वैद्यकीय अधिकारी सर्व नागरी आरोग्य केंद्र | सकाळी ८.०० ते सायं ४.०० | नियमित | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| ९ | अपघात वैद्यकीय सेवा किंवा तातडीची सेवा (सार्व. रुग्णालय) व माबारू) | वैद्यकीय अधिक्षक रुग्णालय, वाशी नेरुळ, ऐरोली आणि वैद्यकीय अधिकारी, माता, बाल रुग्णालये बेलापूर, तुर्भे, कोपरखैरणे | २४ तास | तात्काळ | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| १० | बाह्यरुग्ण विभाग | वैद्यकीय अधिक्षक सार्वजनिक रुग्णालय, वाशी नेरुळ, ऐरोली आणि वैद्यकीय अधिकारी, माता बालरुग्णालये, बेलापूर, तुर्भे, कोपरखैरणे, संबंधित वैद्यकीय अधिकारी, नागरी आरोग्य केंद्र (सर्व) | सकाळी ९.०० ते दुपारी १.०० | त्वरित | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| ११ | रुग्णवाहिका सेवा | वैद्यकीय अधिक्षक/निवासी अधिकारी/कार्यरत अपघात वैद्यकीय अधिकारी, सार्वजनिक रुग्णालय, वाशी, नेरुळ,ऐरोली | २४ तास | त्वरित | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |

| अ. क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरवणारे अधिकारी | संपर्क कालावधी | सेवा पुरवण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाचे वरिष्ठ अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १२ | शववाहिका | वैद्यकीय अधिक्षक/निवासी अधिकारी/कार्यरत अपघात वैद्यकीय अधिकारी, सार्वजनिक रुग्णालय, वाशी, नेरुळ,ऐरोली | २४ तास | उपलब्धतेनुसार त्वरीत | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| **अ. क्र.** | **सेवांचा तपशील** | **सेवा पुरवणारे अधिकारी** | **संपर्क कालावधी** | **सेवा पुरवण्याची विहित मुदत** | **सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाचे वरिष्ठ अधिकारी** |
| १३ | रक्तपेढी सेवा | वैद्यकीय अधिक्षक/निवासी वैद्यकीय अधिकारी/कार्यरत अपघात वैद्यकीय अधिकारी, सार्वजनिक रुग्णालय, वाशी | २४ तास | उपलब्धतेनुसार त्वरीत | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| १४ | लसीकरण सेवा | वैद्यकीय अधिक्षक/सार्व. रुग्णालय वाशी, नेरुळ, ऐरोली, माता बाल रुग्णालये आणि वैद्यकीय अधिकारी नागरी आरोग्य केंद्रे (सर्व) | सकाळी ९.०० ते दुपारी १.०० | नियमित | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| १५ | फिरता दवाखाना | वैद्यकीय अधिकारी (फिरता दवाखाना) | दररोज ४ ठिकाणी सकाळी ९.०० ते दुपारी १.०० | त्वरित | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| १६ | वैद्यकीयदृष्ट्या पात्रतेचा दाखला | वैद्यकीय अधिक्षक सार्व. रुग्णालय | सकाळी ९.०० ते दुपारी १.०० | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता व वैद्यकीय तपासणी पूर्ण झाल्यावर २४ तासांत | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| १७ | HIV पॉझिटिव्ह रुग्णांकरिता औषधोपचार | वैद्यकीय अधिक्षक, सार्व रुग्णालय वाशी, नोडल ऑफिसर, सार्व रुग्णालय, वाशी | सकाळी ९.०० ते दुपारी ३.०० | तात्काळ | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |

**आरोग्य विभागांतर्गत विविध व्यवसाय परवाना/दाखले**

| अ. क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरवणारे अधिकारी | संपर्क कालावधी | सेवा पुरवण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाचे वरिष्ठ अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | जन्माचा दाखला देणे | संबंधित विभाग अधिकारी | सकाळी १०.०० ते सायं ५.०० | आवश्यक सर्व कागदपत्रांची पूर्तता झाल्यावर ३ दिवसांत | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| २. | स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कारासाठी पास देणे | संबंधित विभाग अधिकारी | २४ तास | त्वरित | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | मृत्यूचा दाखला देणे | संबंधित विभाग अधिकारी | सकाळी १०.०० ते सायं ५.०० | आवश्यक सर्व कागदपत्रांची पूर्तता झाल्यावर ३ दिवसांत | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| **अ. क्र.** | **सेवांचा तपशील** | **सेवा पुरवणारे अधिकारी** | **संपर्क कालावधी** | **सेवा पुरवण्याची विहित मुदत** | **सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाचे वरिष्ठ अधिकारी** |
| ४ | खाजगी सुश्रृषा गृह नोंदणी | वैद्यकीय आरोग्य अधिकारी | सकाळी १०.०० ते सायं ५.०० | आवश्यक सर्व कागदपत्रांची पूर्तता झाल्यावर ३ दिवसांत | आयुक्त नमुमपा |
| ५ | विवाह नोंदणी | संबंधित विभाग अधिकारी | सकाळी १०.०० ते सायं ५.०० | आवश्यक सर्व कागदपत्रांची पूर्तता झाल्यावर ३ दिवसांत | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |

**पशुवैद्यकीय सेवा**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | मोकाट जनावरांचा बंदोबस्त | संबंधित विभाग अधिकारी व उप स्वच्छता निरीक्षक | सकाळी १०.०० ते सायं ५.०० | २४ तासांत | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| २ | मूषक नियंत्रण | संबंधित विभाग अधिकारी व उप स्वच्छता निरीक्षक | सकाळी १०.०० ते सायं ५.०० | ७ दिवसांत | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |

## रुग्णालय नोंदणी

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात आरोग्य विभागामार्फत दि. बॉम्बे नर्सिंग होम्स रजिस्ट्रेशन (सुधारित) ॲक्ट २००५ अंतर्गत खाजगी रुग्णालयाची नोंदणी करण्यात येते. सदर कायद्यांतर्गत महानगरपालिका कार्यक्षेत्रात याची अंमलबजावणी करणेकरीता वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांना स्थानिक पर्यवेक्षकीय अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

- दि बॉम्बे नर्सिंग होम्स रजिस्ट्रेशन (सुधारित) ॲक्ट २००५ अंतर्गत नोदंणी व पुर्ननोंदणी प्रमाणपत्र ०१ एप्रिल ते ३१ मार्च या तीन वर्षांच्या कालावधीकरीता आहे.
- खाजगी रुग्णालयाची नोंदणी न केल्यास रुपये १०.०००/-दंड व सहा महिन्याचा कारावास ही शिक्षा होऊ शकते.
- रुग्णालयाची पुर्ननोंदणी न केल्यास रुपये ५,०००/- दंड पुढील प्रत्येक दिवसासाठी रु. ५०/- दंड होऊ शकतो.
- कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया गृह नोंदणी व पुर्ननोंदणी ०१ एप्रिल ते ३१ मार्च या एक वर्षाच्या कालावधीकरीता करण्यात येते.
- नागरी आरोग्य केंद्र स्तरावर रु.५/- जमा करुन पावती देऊन सदर अर्ज खाजगी नर्सिंग होमला उपलब्ध करुन देण्यात येतात.

**१. रुग्णालय नोंदणी व पुर्ननोंदणी करीता विहीत नमुन्यातील अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे**

१. विहीत नमुन्यातील अर्ज शुल्क रु.५/- भरल्याची पावती आरोग्य विभाग मुख्यालय येथे सादर करणे.
२. जागेचे भोगवटा प्रमाणपत्र
३. बांधकामाचा अधिकृत नकाशा
४. जागेचा करारनामा
५. सिडको/नगररचना विभागाचे रुग्णालय व वापरास परवानगी असलेले प्रमाणपत्र

६. व्यावसायिक मालमत्ता कर भरणा केल्याची अद्ययावत पावती

७. जागेच्या मालकाचे अद्ययावत ना हरकत प्रमाणपत्र

८ रुग्णालयातील सर्व डॉक्टर्स व त्यांची महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलची नोंदणी प्रमाणपत्रे

९. परिचारिकांची नावे व त्यांची महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी प्रमाणपत्रे

१०.रुग्णालयातील जैविक कचरा विल्हेवाटी संदर्भात एजन्सी नेमल्याची अद्ययावत कागदपत्रे

११.महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अद्ययावत नोंदणी प्रमाणपत्र

१२.भागीदारी तत्वावर असल्यास पार्टनरशीप डीड

१३.स्थानिक स्वराज्य संस्था कर विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र

१४.अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र 'B' फॉर्म

१५.नोंदणी शुल्क : रुग्णखाटा - १० पर्यंत शुल्क -- रु.१००/

रुग्णखाटा - १० पेक्षा जास्त शुल्क-रु.२००/

**२. कुटुंब नियोजन शस्त्रक्रियागृह नोंदणी व पुर्ननोंदणी करिता आवश्यक कागदपत्रे**

१. स्त्रीरोगतज्ञाचा विहीत नमुन्यातील अर्ज (निःशुल्क) मुख्यालय आरोग्य विभागात सादर करणे.

२. रुग्णालय नोंदणी प्रमाणपत्र.

३. स्त्रीरोगतज्ञांचे, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचे प्रमाणपत्र.

४. भूलतज्ञांचे, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचे प्रमाणपत्र.

५. रक्तपेढी ना हरकत अद्ययावत प्रमाणपत्र.

६. बंधपत्र (रु.१००/- च्या मुद्रांकावर) नवीन नोंदणीकरीता.

**३. अर्जदाराचा नोंदणी करता अर्ज प्राप्त झाल्यानंतर नवीन नोंदणी असल्यास मुख्यालय स्तरावरुन स्थानिक प्राधिकृत पर्यवेक्षकीय अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी रुग्णालयास भेट देतात. तर पुर्ननोंदणी करीता अर्ज प्राप्त झाल्यास ना.आ.केंद्रातील वैद्यकिय अधिका-यामार्फत भेट देण्यात येते.**

भेटीनंतर अपुर्ण कागदपत्रे व भेटीमध्ये आढळलेल्या त्रुटी नमूद करुन, त्रुटींची पुर्तता करणेकरीता ॲक्टमधील तरतुदीनुसार एक महिन्याचा अवधी देण्यात येतो. एका महिन्याच्या अवधीमध्ये पुर्तता न झाल्यास, अर्जदाराचा अर्ज नाकारण्यात येतो व त्यांना रुग्णालय बंद करणेबाबत सूचित करण्यात येते.

**४. उपरोक्त कागदपत्रांची पुर्तता झाल्यानंतर नोंदणी व नुतनीकरण प्रमाणपत्र व कुटुंब नियोजन शस्त्रक्रियागृह नोंदणी व नुतनीकरण प्रमाणपत्र मुख्यालय आरोग्य विभाग येथून दिले जाते.**

**५. हिवताप प्रतिबंधक ना हरकत प्रमाणपत्र मिळणेकरीता आवश्यक कागदपत्रे.**

१. नमुंमपाकडील डेव्हलपमेंट परमिशन.

२. कमिन्समेंट सर्टिफिकेट

३. आर्किटेक्चरकडील कम्पलीशन सर्टिफिकेट

४. ड्रेनेज कम्पलीशन सर्टिफिकेट

५. विभाग अधिकारी यांचेकडील डेब्रिज क्लिअरन्स सर्टिफिकेट.

६. मालमत्ता कर भरणा केल्याची पावता.

७. नगररचना यांनी प्रमाणित केलेल्या बांधकामाचा नकाशा (आवश्यकतेनुसार)

**नवी मुंबई महानगरपालिकेच्या रक्तपेढीतून रक्तपुरवठा करण्याबाबत.**

■ वैद्यकिय अधिक्षक, सार्व.रुग्णालय वाशी यांचेकडे मागणी केल्यास.

■ महानगरपालिका रक्तपेढीतून खाजगी रुग्णालयांना चाचण्या केलेले रक्त पुरविण्यास थैलीमागे रु.३५०/ शुल्क आकारले जाईल. या खर्चामध्ये रक्ताच्या विविध चाचण्या, पी.व्ही.सी. थैली व इतर खर्चाचा समावेश राहील. याचप्रमाणे दिलेल्या रक्ताबद्दल बदली रक्तदाता देणे

बंधनकारक असेल. परंतु रक्ताच्या उपलब्ध साठ्यानुसार रक्तपुरवठा करावयाचा किंवा नाही हे ठरविण्याचे अधिकार संस्थाप्रमुखांना असतील.

- रक्तदात्याला रक्तदानासाठी दिलेल्या कार्डाचा उपयोग करुन विनामुल्य रक्तपुरवठा घेण्यासाठी या कार्डावर त्याने रक्तदान केलेल्या रक्ताईतकेच रक्त महानगरपालिका रुग्णालयात मिळू शकेल. रक्तदात्यांच्या कार्डावर त्यांच्या कुटुंबियांना, नातेवाईकांना व मित्रांना रक्तपुरवठा करता येईल.

## अहोरात्र रुग्णवाहिका व शववाहिका सेवा :

सार्वजनिक रुग्णालय, वाशी येथे ६ रुग्णवाहिका व २ शववाहिका या २४ तास कार्यन्वित ठेवण्यात आलेल्या आहेत. कार्यरत अपघात वैद्यकिय अधिकारी, सार्व. रुग्णालय, वाशी यांचेकडे मागणी केल्यास एम.एम.आर.डी.ए (मुंबई प्रादेशिक योजनेच्या अंतर्गत समाविष्ट असलेली सर्व गावे) क्षेत्रातील नमुंमपा क्षेत्र वगळून रु.५००/- व नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी रु.३००/- दराने उपलब्ध करुन दिल्या जातात.

## जन्म/मृत्यु नोंदणीबाबत मार्गदर्शक सूचना

१. जन्म /मृत्यु नोंदणीचे काम नवी मुंबई महानगरपालिकेच्या ८ विभाग कार्यालयांत विभाग अधिकारी यांच्यामार्फत होते.

२. जन्म/मृत्यु घटना घडल्यापासून २१ दिवसात नोंदणीसाठी अर्ज करणे आवश्यक आहे. २१ दिवसात नोंदणी झाल्यास जन्म /मृत्यु नोंदणी विनामुल्य होते व दाखल्याची मूळ प्रत मोफत देण्यात येते.

३. जन्म/मृत्यु घटना घडल्यापासून २१ दिवसानंतर व ३० दिवसांचे आत नोंदणी साठी अर्ज केल्यास एक रुपया विलंब फी घेऊन नोंदणी करण्यात येते.

४. जन्म/मृत्यु घटना घडल्यापासून ३० दिवसानंतर परंतु १ वर्षाच्या आत नोंदणीसाठी अर्ज केल्यास प्राधिकृत अधिका-याची लेखी परवानगी घेऊन व विलंब फी तीन रुपये भरुन नंतरच नोंदणी करण्यात येते.

## मांस विक्री व्यवसाय परवाना करीता अटी व शर्ती :

१. हा परवाना म्हणजे जागेच्या अधिकृततेचा पुरावा नसून, त्यात नमूद केलेल्या बाबींच्या विक्री पुरताच मर्यादित आहे.

२. हा परवाना अहस्तांतरणीय आहे.

३. कोणताही परवाना धारक त्याचे विक्री केंद्र किंवा त्या विक्री केंद्राचा भाग पोट भाडयाने देऊ शकणार नाही.

४. परवाना धारकांनी त्याचा परवाना दर्शनी भागात ठेवावा.

५. परवाना धारकाने विक्री केंद्र व बसण्याची जागा स्वच्छ ठेवावी.

६. परवान्यामध्ये स्पष्ट करण्यात आलेल्या मासांच्या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारच्या मासांची अथवा पदार्थांची विक्री करु नये.

७. मासांचा/पशुधनाचा साठा मर्यादेपेक्षा जास्त प्रमाणात करु नये

८. परवानाधारक शिळे अथवा मानवी आहारास अहितकारक असलेल्या मासांची विक्री करणार नाही.

९. मांस कटाईनंतर शिल्लक राहिलेल्या प्राणीजन्य कच-याची तसेच अतिरिक्त व खाण्यास अयोग्य असल्याने मासांची नियमितपणे जैविक कचरा विल्हेवाट नियम १९९८ (Bio Medical Waste Act, १९९८) अंतर्गत विल्हेवाट लावण्याची जबाबदारी परवानाधारकाची असेल.

१०. परवानाधारकांचे मांस विक्री केंद्राच्या परिसरातील जनतेस कोणत्याही प्रकारचा प्रादुर्भाव होणार नाही याची दक्षता घ्यावी. नसता आपणाला देण्यात आलेला परवाना रद्द करण्यात येईल.

११. प्रचलित कायद्यानुसार अधिकृत असलेल्या वचन व मापे व्यतिरिक्त अन्य वजन मापे वापरु नयेत.

१२. महापालिकेने बाजारात उपलब्ध केलेल्या पाण्याच्या सुविधेचा दुरुपयोग अथवा अपव्यय करु नये.

१३. जेव्हा-जेव्हा महापालिकेचे प्राधिकृत अधिकारी विक्री केंद्राचे निरीक्षण/तपासणी करण्यासाठी येतील तेव्हा त्यांची निरीक्षण/तपासणीसाठी सर्व प्रकारची व्यवस्था करावी व त्यांना अपेक्षित असलेली कागदपत्रे व पुरक माहिती तपासणींच्या ठिकाणी तात्काळ उपलब्ध करुन घ्यावी.

१४. अनुज्ञाप्तींच्या समाप्तीच्या विहित कालावधीपुर्वी परवानाधारकास नुतनीकरणासाठी अर्ज करणे बंधनकारक असेल.

१५. परवानाधारकावर विक्रीस ठेवण्यात येणा-या मासांचे खालीलप्रमाणे विहीत नमुन्यानुसार साठा नोंदवही ठेवणे व ती तपासणीसाठी येणा-या निरिक्षण अधिका-यास पडताळणीसाठी दाखवणे व त्यातील नोंदी अद्ययावत ठेवणे बंधनकारक असेल.

| अ क्र. | दिनांक | परवान्यातील पशुधनाचा/ मासांचा तपशिल | सरुवातीची पशुधनाची/मासांची संख्या/वजन | दिवसातील पशुधनाची/ मांसाची खरेदी | दिवसातील पशुधनाची/ मासांची विक्री | निव्वळ शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

१६. अनुज्ञाप्तीच्या समाप्तीनंतर परवानाधारकास कोणतीही कृती करण्याचे थांबवावे आणि बंद करावे लागेल.

१७. मांस विक्री केंद्रामध्ये, संसर्गजन्य रोगापासून गस्त असलेल्या अशा कोणत्याही व्यक्तीस प्रवेश अथवा कृती करणे निषिद्ध असेल.

१८. परवानाधारकावर मांस विक्रि केंद्रामध्ये कार्यरत असलेल्या कामगारांची दर सहा महिन्याने वैद्यकिय तपासणी करणे बंधनकारक असेल.

१९. परवानाधारकावर मांस विक्री केंद्राची दर सहा महिन्याने किटकनाशक फवारणी करणे बंधनकारक असेल.

२०. सहकारी गृहनिर्माण संस्थेची स्थापना व नोंदणीकृत झाल्यावर परवानाधारकांस मांस विक्री केंद्रासाठी सोसायटीकडून ना हरकत दाखला घेणे बंधनकारक असेल.

२१. परवानाधारकांस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३३१ व ४५८ चे पोटकलम (२६) (२७) (२८) (२९) व (४८) अन्वये तयार करण्यात आलेली नवी मुंबई महानगरपालिका बाजार व कत्तलखाने या उपविधीतील व इतर प्रचलित कायद्यातील नियमांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक असेल व त्याचे उल्लंघन करु नये. त्याचे उल्लंघन केल्यास, परवानाधारकाचा परवाना रद्द करण्याचा अधिकार आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवला आहे.

## राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम

| अ. क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरवणारे अधिकारी | संपर्क कालावधी | सेवा पुरवण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाचे वरिष्ठ अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्य क्षेत्रात डास अळी नाशक फवारणी करणे, रासायनिक धुरीकरण करणे व सर्वेक्षण करणे | संबंधित नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी | सकाळी ७.३० ते दुपारी ४.०० वा. | तक्रार प्राप्त झाल्यानंतर २४ तासांत | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| २ | हिवताप उपविधीची अंमलबजावणी | वैद्यकीय अधिकारी (राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम) | सकाळी १०.०० ते ते सायं ५.४५ वा. | आवश्यक कागदपत्रे व त्रुटींची पूर्तता केल्यानंतर ७ दिवसांत | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |

**हिवताप प्रतिबंधक ना हरकत प्रमाणपत्र मिळण्याकरिता आवश्यक कागदपत्रे**

१. नमुंमपाकडील डेव्हलपमेंट परमिशन.

२. कमिसमेंट प्रमाणपत्र

३. अर्किटेक कम्प्लीशन प्रमाणपत्र.

४. मलनिःस्सारण जोडणी प्रमाणपत्र

५. विभाग अधिकारी यांचे डेब्रीज नाहरकत प्रमाणपत्र

६. मालमत्ता कर भरणा केल्याची पावती.

७ नगररचना यांनी प्रमाणित केलेल्या बांधकामाचा नकाशा (आवश्यकतेनुसार)

**************************************************************************************